# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे (हिवाळी) अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मराठी माध्यमांच्या सर्व शाळांना निवासी दराने मनपाचे कर लागू करणेबाबत

**(१) २४२ (१८-०३-२०२०). श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील : दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४६६९६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका महापौर, उपमहापौर व आयुक्त यांच्या समवेत औरंगाबाद शहरातील मराठी व उर्दू माध्यमाच्या अनुदानित शाळांना करातून सवलत दयावी यामागणीसाठी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या सह शाळांच्या संस्था चालकांची एक बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत शाळेच्या संस्था चालकांनी केलेल्या मागणीचे स्वरुप काय आहे तसेच उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन औरंगाबाद महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर बैठकीत शैक्षणिक संस्था चालकांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३२(१)ब अन्वये सामान्य कर माफ करावे अशी मागणी केली आहे.

सदर मागणीच्या अनुषंगाने, औरंगाबाद महानगरपालिकेचे दिनांक ३०/१२/२०१६ च्या कार्यालयीन आदेशान्वये शैक्षणिक संस्थेच्या मालमत्ता कराचा अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी मुख्य लेखापरिक्षक औरंगाबाद महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली.

समितीची बैठक दिनांक ८/१२/२०१७ मध्ये घेण्यात आलेली असून, औरंगाबाद महानगरपालिकेच्या ठराव क्र.५१०/ई, दिनांक ७/०२/२०१४ अन्वये संमत केलेल्या ठरावानुसार शैक्षणिक संस्थांना करण्यात आलेली कर आकारणी योग्य असून त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही, असा समितीने निर्णय घेतला असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील नगरपरिषदांमध्ये अनुकंपा तत्वावरील अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(२) १००१ (१८-०३-२०२०). डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदांमध्ये आस्थापना खर्चाची मर्यादा असल्याने अनुकंपा तत्वावरील अनेक प्रकरणे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुकंपा तत्वावरील प्रकरणावर कार्यवाही करणेबाबत शासनाचे धोरण काय आहे तसेच अनुकंपा तत्वावरील प्रकरणे त्वरित निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही. अनुकंपा नियुक्ती योजनेंतर्गत केली जाणारी वारसाची नियुक्ती त्याच कर्मचाऱ्यांच्या रिक्त झालेल्या पदावर करण्यात येते त्यामुळे अनुकंपा तत्वावरील प्रकरणांमध्ये आस्थापना खर्चाची मर्यादा लागू राहत नाही.

(२) राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायतींमधील पात्र अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा नियुक्ती योजनेसंदर्भात दिनांक ११/०७/२०१९ रोजीन्वये सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील नगरपरिषदांच्या आकृतिबंधात सुधारणा करण्याबाबत

**(३) १००३ (१८-०३-२०२०). डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा : दिनांक २० जुलै, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ३५८५७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नगरपरिषदांचा आकृतिबंध सन २००५ मध्ये मंजूर झाला असून अस्थायी पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यावर सदर पद रिक्त होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदांच्या कर्मचारी संख्येमध्ये मोठया प्रमाणावर घट झाल्यामुळे त्याचा नगरपरिषदेच्या कामकाजावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आकृतिबंधात सुधारणा करणे तसेच कर्मचारी भरतीबाबत शासनाचे धोरण काय आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-१०-२०२०)** : (१) व (२) होय, राज्यातील नगरपरिषदांसाठी सन २००५ मध्ये आकृतिबंध मंजूर करण्यात आला होता.

अस्थायी पदे व्यपगत झाली तरी, आकृतिबंधात नियमित पदे विहित प्रमाणात मंजूर असल्याने, कामकाजावर प्रतिकूल परिणाम होत नाही.

(३) दिनांक ०५/०७/२०१६, दिनांक २२/०९/२०१६ व दिनांक १७/०६/२०१९ अन्वये १३५ नवनिर्मित नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी आकृतिबंध निश्चित करण्यात आले आहेत.

शहराची लोकसंख्या व अन्य विहित निकषानुसार आकृतिबंधामध्ये सुधारणा करण्यात येते. तसेच, वेळोवेळी विहित शासन धोरण व नियमानुसार कर्मचारी नियुक्ती/ भरती होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला शहरातील पार्किगच्या समस्येबाबत

**(४) १२१४ (१८-०३-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरात पार्किंगचा प्रश्न गंभीर होत चालला असून पार्किंग म्हणून दाखविण्यात आलेल्या हॉटेलच्या जागा इतर गोष्टींच्या उपयोगासाठी वापरल्या जात असल्याने हॉटेल पार्किंगचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहर मध्यवस्तीत शेकडो हॉटेल्स असून सदर हॉटेल्सच्या पार्किंगची जागा तळ मजल्यावर दाखविण्यात आल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार पार्किंगचा प्रश्न तात्काळ सोडविण्याच्यादृष्टीने शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-१०-२०२०) :** (१) अशी वस्तुस्थिती आढळून आलेली आहे.

(२), (३) व (४) महापालिकेने केलेल्या अनधिकृत बांधकाम सर्व्हेक्षणाचे दरम्यान शहरात एकूण ५९ व्यावसायिक आस्थापनांनी, पार्किंग म्हणून दर्शविलेल्या जागांचा इतर प्रयोजनाकरिता वापर केल्याचे निदर्शनास आलेले आहे. यात शहराच्या मध्यवस्तीतील २४ हॉटेलचादेखील समावेश आहे.

या सर्व अनधिकृत बांधकामधारकांना, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील कलम ५२, ५३, ५४ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६० व २६७ नुसार विहित मुदतीच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या असून, यावर सहायक संचालक, नगररचना यांचे स्तरावर सुनावणी घेवून पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

## मुंबईत येथे कांदळवन उद्यानाची निर्मिती करण्याबाबत

**(५) १३३० (१८-०३-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागरी जीवसृष्टीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या खारफुटी वनस्पतीचे जतन व संवर्धन करण्याचा संकल्प शासनाने केला असून, मुंबईतील ३८ हेक्टर क्षेत्रात दोन कांदळवन उद्यानाची निर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदळवन उद्यानासाठी किती रुपयांचा खर्च अपेक्षित असून सदर प्रस्तावाचे स्वरूप काय आहे,

(३) तसेच, सदरहू कांदळवन उद्यान निर्मितीबाबतची सद्य:स्थिती काय आहे आणि सदरहू उद्यान निर्मितीसाठी किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (०६-१०-२०२०) :** (१) मौजे गोराई (बोरीवली) न.भु.क्र. ८८३ येथे ८ हेक्टर तसेच मौजे दहिसर न.भु.क्र.३१२९ ते ३१३८ येथे ३० हेक्टर आर असे एकूण ३८ हेक्टर क्षेत्रावर कांदळवन उद्यानाची निर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) मौजे गोराई (बोरीवली) येथील प्रकल्प २६.९७ कोटी रुपयांचा असून सदर प्रकल्पांतर्गत निसर्ग माहिती केंद्र, कांदळवन संग्रहालय, बोर्डवॉक, नौका विहार या बाबी प्रस्तावित आहेत. तर मौजे दहिसर येथील प्रकल्प ४४.८० कोटी रुपयांचा असून सदर प्रकल्पांतर्गत निसर्ग माहिती केंद्र, कांदळवन संग्रहालय, बोडवॉक, पक्षी निरीक्षण मनोरा आणि नौका विहार या बाबी प्रस्तावित आहेत.

(३) व (४) प्रस्तावित दोन्ही प्रकल्पास MCZMA, SEIAA वन संवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत तत्वतः मंजूरी प्राप्त झाली आहे. तसेच सदर प्रकल्पास निसर्ग पर्यटन मंडळ व मा.उच्च न्यायालयाची देखील परवानगी प्राप्त झाली असून दोन्ही प्रकल्पाच्या कामास तांत्रिक मंजूरी देण्यात आलेली आहे.

गोराई येथील कांदळवन उद्यानाबाबत प्राप्त निविदांना मान्यता देणे व दहिसर येथील उद्यानाबाबत प्रशासकीय मान्यता देणे या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

---

## भिवंडी येथील नाट्यगृहाची दुरवस्था झाल्याबाबत

**(६) १४३५ (१८-०३-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी येथील नाट्य रसिकांसाठी २५ वर्षांपूर्वी उभारलेल्या नाट्यगृहाची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाट्यगृहाच्या देखभाल दुरुस्तीवर मोठा खर्च होणार असून भिवंडी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बेताची असल्याने दुरुस्तीचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नाट्यगृहाच्या दुरुस्तीबाबत नाट्यरसिकांच्या मागणीनुसार मा.नगर विकास मंत्री यांनी आश्वासन दिल्यानुसार १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर नाट्यगृहाची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) भिवंडी येथील स्व.मीनाताई ठाकरे नाट्यगृहाची दुरवस्था झाल्याने सदर नाट्यगृह जानेवारी, २०१८ पासून बंद ठेवण्यात आल्याचे भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(२), (३) व (४) सदर नाट्यगृहाच्या देखभाल दुरूस्तीच्या खर्चाच्या अनुषंगाने रूपये १० कोटीच्या मर्यादेत निधी उपलब्ध करुन देण्याचा तत्वत: निर्णय घेण्यात आला असून सदर प्रयोजनांतर्गत सविस्तर अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसह त्वरीत सादर करण्याबाबत भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेस यापूर्वीच सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (पश्चिम) नायगांव कोळीवाडा येथील बेकरीमधुन सातत्याने प्रदूषण केले जात असल्याबाबत

**(७) १५३७ (१८-०३-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (पश्चिम) नायगांव कोळीवाडा येथील स्थानिक नागरिकांनी त्यांच्या परिसरात असलेल्या बेकरीमधुन सातत्याने प्रदूषण केले जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात नागरिकांनी महानगरपालिका व आरोग्य विभागात तक्रार करुनही कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संताप व नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी/चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनस्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१०-२०२०) :** (१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात "डेली फ्रेश" ही बेकरी अनधिकृतपणे सुरू असून सदर बेकरी बंद करण्याबाबतची लेखी तक्रार स्थानिक नागरिकांनी दिनांक ०८/०१/२०२० रोजी वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे केली होती.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी वसई-विरार शहर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांमार्फत सदर ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन सदरची बेकरी बंद करण्यात आली होती.
- तथापि, सदर बेकरी पुन्हा सुरू झाली असल्याचे निदर्शनास आल्यानंतर महानगरपालिकेमार्फत बेकरीस नोटीस देण्यात आली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
- कोविड-१९ चा प्रादुर्भाव व लॉकडाऊन झाल्यामुळे सदर प्रकरणावर कारवाई करण्यास विलंब झाला असल्याचे वस्तुस्थिती वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

---

## नागपूर महानगरपालिका क्षेत्रात मोबाईल टॉवर्स नियमित नसल्याबाबत

**(८) १५७३ (१८-०३-२०२०). श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका क्षेत्रात ७५१ मोबाईल टॉवर्स नियमित नसल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने किती मोबाईल टॉवर कंपनीवर कारवाई केली आहे व अद्यापपावेतो किती दंड वसूल करण्यात आला वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०९-२०२०) :** (१), (२) व (३) नागपूर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ७६९ मोबाईल टॉवर्स असून, त्यापैकी १८ मोबाईल टॉवर्सना एक वर्षाकरिता अस्थायी परवानगी दिलेली असून, ७५१ मोबाईल टॉवर्स नियमित नसल्याचे दिसून आले आहे.

मोबाईल टॉवर्सच्या परवानगीसाठी महापालिकेने ०१ वर्षाकरिता तात्पुरत्या स्वरुपात परवानगी देण्याबाबत, धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे निश्चित केलेली असून, या अंतर्गत रुपये ३०,०००/- प्रति टॉवर प्रमाणे शुल्क आकारण्यात येते.

या धोरणांतर्गत परवानगी प्राप्त करुन घेण्यासाठी २४४ आवेदने प्राप्त झालेली असून, याव्दारे रुपये ७३.२० लक्ष जमा झाले आहेत.

महापालिकेच्या या धोरणाविरुध्द इंडस टॉवर्स या कंपनीने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.५६९/२०२० मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २८/०१/२०२० च्या आदेशानुसार “अंतरिम रिलीफ” दिलेला असल्याने, पुढील कार्यवाही स्थगित ठेवण्यात आलेली आहे.

याशिवाय रिट याचिका क्र.२०४३/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १२/०९/२०१४ रोजी पारित करुन, शासन व इतर स्थानिक प्राधिकरणांनी अनधिकृत मोबाईल टॉवर्सविरुध्द कोणतीही दंडात्मक कार्यवाही (Coercive steps) करुन नये, असे निर्देश दिले आहेत. त्यामुळे अशा प्रकरणात कार्यवाही करता आलेली नाही, असे नागपूर महानगरपालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने दिनांक १७/०२/२०१८ रोजी दूरसंचार पायाभूत सुविधा धोरण जाहिर केले असून, त्यामधील तरतुदीनुसार महानगरपालिकेकडून अंमलबजावणी करुन उचित कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्यास नागपूर महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

---

## वसई-विरार महापालिकेचा (जि.पालघर) कारभार आयुक्त आणि उपायुक्तांशिवाय सुरु असल्याबाबत

**(९) १७०९ (१८-०३-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वसई-विरार महापालिकेचा कारभार सध्या आयुक्त आणि उपायुक्तांशिवाय सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेचा कारभार अतिरिक्त आयुक्तांच्या मदतीने सुरु असल्याने आयुक्त व उपायुक्तांची नेमणूक न होण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आयुक्त व उपायुक्तांची तात्काळ नेमणूक करण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१०-२०२०) :** (१) व (२) वसई-विरार महानगरपालिकेतील तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांच्या नियतवयोमान सेवानिवृत्तीमुळे सदर पद रिक्त होते.

तथापि, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १३/०३/२०२० रोजीच्या नियुक्ती आदेशान्वये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची वसई विरार महानगरपालिकेच्या रिक्त महानगरपालिका आयुक्त या पदावर नियमित आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे.

तसेच, वसई विरार महानगरपालिकेत २ अतिरिक्त आयुक्त व ३ उपायुक्तांच्या देखील नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड नगरपरिषदेमार्फत उभारण्यात येणाऱ्या भीमसृष्टीचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) २०१७ (१७-०३-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपरिषदेमार्फत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयानजीक उभारण्यात येणाऱ्या भीमसृष्टीचे काम बऱ्याच कालावधीपासुन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाकरीता बीड नगरपरिषदेने किती रुपयांचा निधी मंजूर केला असून किती रक्कम ठेकेदारास देण्यात आली आहे,

(३) असल्यास, ठेकेदाराने सदर काम प्रलंबित ठेवून बीड नगरपरिषदेचे पदाधिकाऱ्यांसोबत आर्थिक संगनमताने गैरव्यवहार केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी ठेकेदार व बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई करुन भीमसृष्टीचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०९-२०२०) :** (१) हे खरे आहे.

बीड नगरपरिषदेमार्फत उभारण्यात येणाऱ्या भीमसृष्टीच्या एकूण ८ म्युरल बसविण्याच्या कामांपैकी ५ म्युरलचे काम पुर्ण झालेले असून, लॉकडाऊनमुळे ३ म्युरल बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) सदर कामाकरीता बीड नगरपरिषदेस एकूण रुपये ३१,०२,०००/- इतका निधी मंजूर असून, त्यापैकी ठेकेदाराच्या मागणीनुसार रुपये १८,२८,४३६/- इतकी रक्कम अदा करण्यात आली असल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

## औरंगाबाद शहरात महापालिकेचे स्पेशालिटी / स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय उभारण्याबाबत

**(११) २८६९ (२९-०५-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात महापालिकेचे एकही स्पेशालिटी / स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय नसल्याने संसर्गजन्य रुग्णांची फार गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६-२०१७ मध्ये स्वाईन फ्लू व सन २०१८ मध्ये छावणी परिसरात डायरियाची साथ तसेच सन २०१९ मध्ये डेंग्यूने औरंगाबादच्या आरोग्य व्यवस्थेसमोर फार मोठे संकट उभे केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार औरंगाबाद शहरात महापालिकेचे स्पेशालिटी / स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२०) :** (१) औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय कार्यरत नसून, सध्या अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेच्या आरोग्य यंत्रणेमार्फत शहरातील रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे आहे.

(३) औरंगाबाद शहरात चिखलठाणा औद्यागिक क्षेत्रात कोविड-१९ च्या रुग्णांसाठी २५० खाटांचे रुग्णालय तयार करण्यात येत असून, सदर रुग्णालय हे पुढे संसर्गजन्य साथ रोग रुग्णालय म्हणून कार्यान्वित होणार असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) २९३० (२९-०५-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३७ ला दिनांक १८ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत विविध संवर्गातील ३४९ मंजूर पदापैकी १२१ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात तत्कालीन राज्यमंत्री (नगर विकास) यांच्याकडे दिनांक ६ ऑगस्ट, २०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार आरोग्य विभागांतर्गत विविध संवर्गातील एकूण ९५९ पदांच्या आकृतिबंधास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आली नसल्यामुळे सदर प्रस्ताव महानगरपालिकेकडे परत पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद महानगरपालिकेने शासनास सादर केलेल्या सर्व विभागांचा एकत्रित आकृतिबंध प्रस्तावाची छाननी करण्याची कार्यवाही अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर पदनिर्मितीस मान्यता देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२०)** : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्व विभागांच्या पदांचा एकत्रित आकृतिबंध सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून महानगरपालिकेने शासनास सादर केला होता. सदर आकृतिबंधामध्ये आरोग्य विभागातील उक्त नमूद पदांचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदर प्रस्तावाबाबत शासनाने काही सूचना महानगरपालिकेस केल्या असून, सदर सूचनेनुसार आकृतिबंधाचा सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्यात येत असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात दीनदयाळ अंत्योदय योजना व राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान या योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) २९८३ (२९-०५-२०२०). श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २६ महापालिकांमध्ये राबविण्यात येणाऱ्या दीनदयाळ अंत्योदय योजना व राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानासाठी केंद्र शासनाकडून ६० टक्के तर राज्य शासनाकडून ४० टक्के निधी उपलब्ध करून देण्यात येत असून उक्त योजनेव्दारे शहरात राहणाऱ्या एस.सी, एस.टी, अल्पसंख्याक व दारिद्रय रेषेखालील नागरीकांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी प्रयत्न केला जातो तसेच प्रति लाभार्थी १५ हजार रूपये शुल्क केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थी संस्थेला दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गत २ वर्षात कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार केला असून प्रशिक्षणाच्या नावाखाली बनावट लाभार्थी उभे करुन चालू वर्षात उक्त योजनेंतर्गत ४५ हून अधिक शिबिरे घेण्यात आल्याचे कागदोपत्री दाखवून एका शिबिरात किमान तीस लाभार्थ्यांचा समावेश करुन प्रति शिबिर साडेचार लाख रूपये याप्रमाणे आतापर्यंत या योजनेंवर सुमारे दीड कोटी रूपयांचा खर्च करण्यात आला असून गतवर्षी दोन कोटीच्या आसपास खर्च करण्यात आल्याचे दर्शविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना राबविण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांनी शिबिरार्थ्यांचे थम्ब व संस्थांची कोणतीही माहिती न घेता देयके अदा केल्याबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री.भारत मिरपगारे यांनी आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये या योजनेमधील गैरप्रकाराबाबत चौकशी करून संबंधित दोषीविरोधात कारवाई करण्याची मागणी लेखी तक्रारीव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-१०-२०२०) :** (१) होय.
(२) नाही, या योजनेंतर्गत नगरपालिका प्रशासन संचालनालयामार्फत महाराष्ट्र कौशल्य विकास संस्था यांना निधी उपलब्ध करुन दिला जातो. महाराष्ट्र कौशल्य विकास संस्था यांचेमार्फत प्रशिक्षण संस्थांना थेट त्यांचे बँक खात्यावर प्रशिक्षणार्थींची पोर्टलवरील दैनंदिन बायोमेट्रिक हजेरी विचारात घेऊन शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रशिक्षण संस्थांना तीन हप्त्यांमध्ये निधी वितरीत केला जातो व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र MSSDS मार्फत राज्य अभियान संचालक यांना सादर करण्यात येते.
(३) व (४) श्री.भारत मिरपगारे यांनी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये तक्रार केली ही बाब खरी आहे.

तथापि, थम्ब व संस्थांची माहिती न घेता देयके अदा केली ही बाब खरी नाही. सदर योजनेची संपूर्ण कार्यवाही Online असून, प्रशिक्षणास प्रवेश घेणाऱ्या शिबिरामध्ये थम्ब (Bio Metric) हजेरीच्या आधारे शासन मान्य प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश दिला जातो आणि शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार टप्प्या-टप्प्याने पोर्टलवरील दैनंदिन Bio-Metric हजेरीच्या आधारे प्रशिक्षण संस्थांना त्यांचे बँक खात्यावर महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांच्यामार्फत निधी (फी) रक्कम अदा केली जाते. प्रकरणी सहा.आयुक्त, नागरवस्ती विकास योजना विभाग यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली असून, चौकशीत तथ्य आढळून आलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केईएम, नायर, लोकमान्य टिळक व कुपर रूग्णालयाच्या रक्तपेढ्यांमध्ये डेटा लॉगर सुविधा लावण्याबाबत

**(१४) २९८८ (१७-०७-२०२०). श्री.प्रसाद लाड, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महापालिकेच्या केईएम, नायर, लोकमान्य टिळक व कुपर आदी रूग्णालयाच्या रक्तपेढयामध्ये सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान विशेष गरज नसताना कोटयवधी रूपये खर्च करून डेटा लॉगर सुविधा लावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रणाली खरेदी करताना झालेला कागदोपत्री दस्ताऐवज महापालिकेकडे उपलब्ध नसल्यामुळे उपरोक्त मशीन विकत घेतली की ती संस्थेमार्फत डोनेशनमध्ये देण्यात आली याबाबत शंका व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त यंत्रसामुग्री दिलेल्या कंपनीकडे संबंधित प्रणालीसाठी मागणी करण्यात आली नसून यासंदर्भातील देखभाल कंत्राट, प्रकल्प व्यवस्थापन कंत्राट, हमीपत्र तसेच हमी किती वर्षासाठी वाढवली आहे याबाबतची कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे संबंधित रूग्णालयाच्या रक्तपेढी प्रमुखांनी स्पष्ट केले असून सदर प्रणाली अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांतर्गत लावण्यात आल्याचेही नमूद नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रक्तपेढ्यांमध्ये रेफ्रिजरेटर्सचे नियंत्रण करणे सोयीस्कर व्हावे याकरिता केईएम, नायर, लोकमान्य टिळक व कुपर आदी रुग्णालयांच्या मागणीनुसार तेथील रक्तपेढ्यांमध्ये सन २०१५ मध्ये महानगरपालिकेच्या प्रचलित पध्दतीनुसार स्पर्धात्मक निविदा मागवून डेटा लॉगर सुविधा लावण्यात आली आहे.

सदर सुविधा प्रणालीकरिता रुपये ७०.८३ लक्ष इतका खर्च करण्यात आला असून, सदर प्रणालीकरिता आवश्यक असलेली देखभाल कंत्राट, हमीपत्र तसेच हमी कालावधी याबाबतची कागदपत्रे महानगरपालिकेकडे उपलब्ध आहेत.

तसेच सदर प्रणाली अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांतर्गत लावण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी महानगरपालिकेने ठेकेदाराला रक्कम अदा करण्याचा ठराव मंजूर केल्याबाबत

**(१५) २९९० (०३-०७-२०२०). श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत घनकचऱ्याचे व्यवस्थापन करणाऱ्या मे.ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग सेल प्रा.लि. कंपनीच्या ठेकेदाराला रुपये १५ कोटी ४६ लाख ६ हजार १४३ इतकी मुळ रक्कम व्याजासह अदा करण्याबाबतचा ठराव बेकायदेशीरपणे दिनांक १८ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महापालिकेची आर्थिक स्थिती बिकट असताना आणि प्रकरण उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असताना ठेकेदारांच्या हितासाठी मंजूर करण्यात आलेला ठराव रद्द करण्याचे महानगरपालिका आयुक्तांना आदेश द्यावेत अशी मागणी भिवंडी महापालिकेचे माजी उपमहापौर, जेष्ठ नगरसेवक श्री.जावेद दळवी यांनी एका लेखी निवेदनाव्दारे मा.नगर विकास मंत्री, प्रधान सचिव, नगर विकास विभाग आदींकडे माहे फेब्रुवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवडयात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१०-२०२०) :** (१) मे.ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग सेल प्रा.लि. यांना महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन, कचऱ्याची विल्हेवाट लावणे, खत प्रकल्प तयार करणे इ. बाबींसाठी दिनांक १५/१०/२००५ रोजी १० वर्षाच्या कालावधीकरीता ठेका दिला होता.

सदर ठेकेदाराविरुध्दच्या तक्रारी, कामातील अनियमतता इ. कारणांसाठी सदर ठेका रद्द करण्यात आला होता. सदर ठेका रद्द करु नये याकरीता ठेकेदाराने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.८२७२/२०११ दाखल केली. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने लवादाची नियुक्ती केली.

सदर लवादांनी दिनांक १६/०९/२०१९ रोजी निर्णय दिला. सदर निर्णयाविरुध्द भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयात कमर्शिअल आरबिट्रेशन याचिका क्र.७१/२० अन्वये अपिल माहे जानेवारी, २०२० मध्ये दाखल केली.

तथापि, या प्रकरणी मे.ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग सेल प्रा.लि. यांनी तडजोडीचा प्रस्ताव दिला. सदर तडजोडीचा प्रस्ताव व लवादांनी दिलेल्या निर्णयानुसार मे.ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग सेल प्रा.लि. यांना विवादीत रक्कम रुपये १५.०० कोटी प्रदान करण्याचा ठराव दिनांक १८/०२/२०२० रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४८१ (आय) व (ह) मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेने पारित केला आहे.

(२) भिवंडी महानगरपालिकेचे माजी महापौर श्री.जावेद दळवी यांचे अशा विषयाबाबतचे निवेदन शासनास तसेच महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) मा.उच्च न्यायालयात दाखल याचिकेदरम्यान दिनांक ३/७/२०२० रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द महानगरपालिकेमार्फत मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यात जातीचे दावे अवैध ठरलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवेतुन दुर करण्याबाबत

**(१६) २९९४ (०२-०६-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रशांत परिचारक, श्री.सुजितसिंह ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ३९४ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जातीचे दावे अवैध ठरलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेतुन दुर करण्याचे आदेश मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिले असतांना देखील त्यांची अंमलबजावणी न करता अप्रत्यक्षरित्या शासन अशा कर्मचाऱ्यांना संरक्षण देत असल्याची बाब निदर्शनात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरक्षित पदावर नियुक्ती केलेल्या सुमारे ६३ हजार कर्मचाऱ्यांपैकी १२५०० कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले असून मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी व मा.उच्च न्यायालय, नागपूर यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार ज्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहेत ती पदे रिक्त करावी व त्याच जातीच्या आरक्षणातुन सदर पदे नव्याने भरली जाण्याची प्रक्रिया दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश पारित केले असूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२५-०९-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेता, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक २१/१२/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत नियुक्त झालेल्या व सदर जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांची पदे रिक्त करुन ती रिक्त झालेली पदे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्याचे व जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत. तसेच सदर रिक्त झालेली पदे कालबध्द कार्यक्रमानुसार भरण्याचे आदेशही देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालम (जि.परभणी) नगरपंचायतीच्या विविध विकास कामात गैरकारभार झाल्याबाबत

**(१७) ३००१ (२९-०५-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालम (जि.परभणी) नगरपंचायतीच्या विविध विकास कामांमध्ये झालेल्या गैरकारभाराची SIT मार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी गंगाखेड येथील माजी लोकप्रतिनिधींनी सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनासोबत दिलेल्या सर्व मुद्दयांची व पुराव्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०९-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांनी उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीमार्फत प्रशासकीय बाबी तपासल्यानंतर तांत्रिक बाबी

तपासण्यासाठी जिल्हाधिकारी, परभणी यांनी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पूर्णा व इतर नगरपरिषदेतील अभियंता यांच्यामार्फत पथक गठीत करुन रितसर तांत्रिक तपासणी करण्यात आली.

उक्त चौकशी समितीच्या अभिप्रायानुसार कामात दोषी आढळलेल्यांवर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी अहवाल सादर केला आहे :-

(१) संबंधित ठेकेदाराकडून स्वखर्चाने रुपये ४८,१८,४९२/- इतक्या रुपयाचे कमी प्रमाणाचे काम सुरु असून, सध्या प्रगतीपथावर आहे.

(२) ज्यात सुधारणा करणे अवघड असल्याने रुपये ११,०१,७८५/- इतकी ठोक रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यात आली आहे.

(३) सदर ठेकेदाराचे नाव नगर पंचायत पालम यांनी काळ्या यादीत टाकले आहे.

(४) सदर कामाशी संबंधित सल्लागार अभियंता यांच्याविरुध्द पालम येथील पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांचे नाव नगर पंचायत पालम यांनी काळ्या यादीत टाकले आहे.

(५) सदर कामामध्ये Third Party Audit ची तपासणी बरोबर झाली नसल्यामुळे जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयाकडून प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(६) तत्कालीन मुख्याधिकारी, नगरपंचायत पालम यांच्याविरुध्द कर्तव्यात कसूर केल्याबाबत, तसेच ठेकेदारास काम न करता रक्कम अतिप्रदान केल्याबाबत विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद (संभाजीनगर) शहरातील कंटेनमेंट क्षेत्रात आरोग्य व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी राहण्याची वेगळी व्यवस्था करण्याबाबत

**(१८) ३०२७ (०३-०६-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या नियमांनुसार कोविड-१९ व्हायरसचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधित क्षेत्रात व कोरोना केअर सेंटरमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची राहण्याची वेगळी व्यवस्था करणे बंधनकारक असतांनाही औरंगाबाद (संभाजीनगर) महानगरपालिकेचे आरोग्य कर्मचारी व कंटेनमेंट क्षेत्रात काम करणारे पोलीस कर्मचारी कर्तव्य बजावल्यानंतर आपआपल्या घरी जात असल्याबाबत माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार कोरोना उपाययोजनासंबंधी कामे करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना घरी जाण्याची परवानगी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

औरंगाबाद शहरातील कोविड केअर सेंटरमध्ये महानगरपालिकेच्या कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय स्वतंत्ररित्या त्या परिसरात करण्यात आलेली आहे.

तसेच काही आरोग्य कर्मचारी व टास्क फोर्ससाठी ज्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिगृहीत करण्यात आलेल्या आहेत. अशा कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्था स्वतंत्ररित्या हॉटेलमध्ये करण्यात आलेली असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खोपोली-पाली-वाकण मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(१९) ३०७८ (२९-०५-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ ला जोडणाऱ्या खोपोली-पाली-वाकण या मार्गाच्या चौपदरीकरणासाठी रुपये १९८ कोटी मंजूर होऊन बेग या ठेकेदाराला कामाचा ठेका दिल्यानंतर ३ वर्षांचा कालावधी होवूनही सदर रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामासाठी गत ३ वर्षात २ कंत्राटदार बदलण्यात आले असून रस्त्याच्या अर्ध्या भागात कॉंक्रीटीकरण केले आहे तर काही ठिकाणी मध्येच रस्ता खोदून ठेवल्याने धुळीचे लोट उसळत असून रोजच लहान-मोठे अपघात होवून वाहनचालकांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याचे काम सद्य:स्थितीत पूर्णत: बंद झाले असून नव्या ठेकेदारानेही काम सोडून दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०९-२०२०) :** (१) होय.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग विभाग (MoRTH), मंत्रालयाने, नव्याने घोषित राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ मधील वाकण फाटा ते पाली फाटा असे ४०.६० कि.मी. (२ lane with paved shoulder) बांधकाम EPC तत्वावर केंद्रीय मंत्रालयाच्या निर्देशानुसार, म.रा.र.वि.महामंडळ (MSRDC), मुंबई मार्फत हाती घेण्यात आला असून मे.वराह इन्फ्रा लि. जोधपुर तर्फे दुय्यम कंत्राटदार मे.बेग कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत सुरु आहे.

(२) अंशत: खरे आहे.

तथापि गंभीर अपघात घडलेला नाही.

(३) व (४) सदरचे ठेकेदार पर प्रातांतील असल्यामुळे Covid-१९ virus out break दरम्यान ठेकेदार कंपनी मुळ गावी निघुन गेल्याने, काम पुर्णत: बंद होते. तसेच सदर बाबत संबंधित ठेकेदारास नोटीस देण्यात आली असून सद्य:स्थितीत मान्सुनपूर्व तयारीची सर्व कामे पूर्ण करुन घेण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कळवा विटावा (जि.ठाणे) येथे नवीन डेपोसाठी आरक्षित भूखंडावर भूमाफियांनी अनधिकृतरित्या झोपड्या बांधल्याबाबत

**(२०) ३०७९ (२९-०५-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने सन २०१२ साली कळवा विटावा येथील सर्व्हे क्र.१७२१ मधील नवीन डेपोसाठी आरक्षित केलेल्या भूखंडावर भूमाफियांनी चारही बाजूने भिंतीचे कुंपण उभारून अनधिकृतरित्या झोपड्या उभारल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डेपोसाठी आरक्षित भूखंड ताब्यात घेण्याबाबतची मागणी परिवहन कामगार संघटनेने ८ वर्षापूर्वी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडे करुनही महानगरपालिकेने सदरहू भूखंड ताब्यात घेण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त भूखंड वारंवार मागणी करूनही महापालिकेने ताब्यात न घेण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर व भूमाफियांवर कारवाई करण्याबाबत तसेच भूखंडावरील अनधिकृत अतिक्रमण निष्कासित करून भूखंड ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१०-२०२०) :** (१) ठाणे महानगरपालिका अधिनस्त कळवा विटावा येथील सर्व्हे क्र.१७२१ पैकी सर्व्हे क्र.१७२१ ब/३ या भूखंडावर ठाणे शहर मंजुर विकास आराखड्यानुसार बस स्टेशन आरक्षण क्र.२ प्रस्तावित असून सदर भूखंडाच्या काही भागात अनधिकृत बांधकामे झालेली आहेत ही वस्तुस्थिती असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) कळवा विटावा येथील सर्व्हे क्र.१७२१ मधील शहर मंजुर विकास आराखड्यानुसार बस स्टेशनसाठी आरक्षित भूखंड संपादीत करण्याबाबत ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन विभागाकडून अद्यापी मागणी झालेली नसल्याने उक्त संपादनाबाबत ठाणे महानगरपालिकेच्या स्तरावर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम १२६ (१)(सी) अन्वये प्रस्तावित करण्यात आलेले नाही.

तथापि, बस स्टेशनसाठी आरक्षित भूखंडावर निदर्शनास आलेली अतिक्रमणे हटविण्याच्या अनुषंगाने तसेच भूखंड विकसित करण्याच्या अनुषंगाने सद्य:स्थितीदर्शक अहवाल चार आठवड्याच्या आत सादर करण्याबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना निर्देश देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धारावी, मुंबई येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(२१) ३१९३ (२९-०५-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात कोरोना विषाणूचा फैलाव मोठ्या प्रमाणात धारावी सारख्या दाटीवाटीच्या झोपडपट्ट्या मधून होत असून सदर झोपडपट्टी भागात सार्वजनिक शौचालयांचा वापर अधिक प्रमाणात होत असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील धारावी झोपडपट्टीच्या विकासाकरिता राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर तब्बल २५ पेक्षा जास्त वेळा निविदा निघूनही धारावीचा पुनर्विकास गत अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार धारावी येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (२२-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

धारावी सारख्या दाटीवाटीच्या झोपडपट्टयांमध्ये आणि एका घरात सरासरी ६-१० लोक एकत्र राहत असून सार्वजनिक शौचालयाचा वापर अधिक प्रमाणात होत असल्याने, तसेच सोशल डिस्टंसिंग पाळणे शक्य होत नसल्यामुळे कोरोनासारख्या विषाणूंचा फैलाव मोठया प्रमाणात एप्रिल, २०२० व त्यादरम्यान झाला होता, असे अभिप्राय बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिले आहेत.
(२) धारावी झोपडपट्टीच्या विकासाकरिता राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर ३ वेळा निविदा मागविण्यात आल्या, तिसऱ्या निविदा प्रक्रियेंतर्गत दोन निविदादार पात्र ठरले आहेत. निविदा प्रक्रिया अंतिम करण्याची कार्यवाही चालु आहे.
(३) धारावी झोपडपट्टीच्या विकासाकरीता प्राप्त निविदेसंदर्भात मा.महाधिवक्ता, महाराष्ट्र शासन यांचे अभिप्राय प्राप्त झाले असून, त्यानुसार प्राप्त निविदांवर सचिव समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या परिचारिका भर्तीमध्ये मागासवर्गीयांवर अन्याय झाल्याबाबत

**(२२) ३१९५ (२९-०५-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेकडून वैद्यकीय कर्मचाऱ्यांची महाभरती सुरू करण्यात आली असून महापालिकेत तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका या पदासाठी भरती करण्यात आली परंतु या भरतीमध्ये मागासवर्गीय उमेदवारांवर अन्याय झाल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महापालिकेने सन २०१८ च्या भरती प्रक्रियेतील निवड न झालेल्या उमेदवारांमधील इच्छुक उमेदवारांना कोविड-१९ च्या उपचारासाठी मुलाखतीव्दारे भरती करून घेण्यासाठी जाहिरात काढली होती व त्या परिपत्रकानुसार प्रत्येक प्रवर्गातील उमेदवाराला हजर राहण्याकरिता वेगवेगळया तारखा देण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार खुला वर्ग दिनांक १३ एप्रिल, अजा वर्ग दिनांक १५ एप्रिल, अज वर्ग दिनांक १६ एप्रिल, वि.जा. अ.भ.ज. (ब), (क) व (ड) साठी दिनांक १७ एप्रिल, वि.मा.प्र. तसेच इ.मा.व. दिनांक १८ एप्रिल, २०२० अशा तारखा प्रत्येक वर्गाला देण्यात आल्या असताना देखील दिनांक १७ एप्रिल, २०२० रोजी भज क व इतर प्रवर्गातील उमेदवारांच्या मुलाखती होण्याआधीच दिनांक १६ एप्रिल, २०२० रोजी निवड झालेल्या उमेदवारांची यादी लावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी मुंबईतील मूळ भूमीपुत्र असलेल्या कोळी समाजावर अन्याय झाला असल्याची बाब आढळून आली असून मागास प्रवर्गातील उमेदवारांची मुलाखत होण्याआधी निवड यादी जाहीर करण्याची

कारणे काय होती, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर भरती प्रक्रियेमध्ये तत्काळ बदल करून विशेष मागास प्रवर्गासाठी पद निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-१०-२०२०) :** (१), (२), (३) व (४) सन २०१८ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेत "परिचारिका" या पदाकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती.

तथापि, कोविड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता, सन २०१८ च्या भरती प्रक्रियेतील निवड न झालेल्या उमेदवारांची "परिचारिका" या पदाकरिता बृहन्मुंबई महानगरपलिकेच्या पोर्टलवर दिनांक १० एप्रिल, २०२० रोजी ८५९ उमेदवारांची यादी त्यांच्या गुणवत्तेनुसार जाहीर करण्यात आली होती.

त्यानुसार खुला वर्ग दिनांक १३ एप्रिल, अ.जा. दिनांक १५ एप्रिल, अ.ज. दिनांक १६ एप्रिल, वि.जा. अ.भ.ज. (ब) (क) व (ड) आणि वि.मा.प्र. साठी दिनांक १७ एप्रिल, तसेच इ.मा.व. दिनांक १८ एप्रिल, २०२० रोजी प्रत्येक प्रवर्गातील उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी हजर राहण्याच्या सूचना दिल्या होत्या.

तसेच कोरोना रुग्णसंख्येत झपाट्याने वाढ होत असल्यामुळे महानगरपालिका रुग्णालयांकडून व कोविड सेंटरकडून परिचारिकांची वारंवार मागणी होत होती.

तथापि, लॉकडाऊन असल्यामुळे ज्यांना जसे उपलब्ध होईल त्या वाहनाने काही उमेदवार कागदपत्रे पडताळणीकरिता हजर होत होते. त्यानुसार महानगरपालिकेमार्फत त्यांची कागदपत्रे पडताळणी करण्यात आली.

तसेच, आरक्षणानुसार विशेष मागास प्रवर्गासाठी २ पदे रिक्त होती. सदर पदांकरिता महानगरपालिकेच्या पोर्टलवरील यादीतील विशेष मागास प्रवर्गातील प्रथम दोन क्रमांकाचे उमेदवार नियोजित दिनांकापूर्वी कागदपत्रे

पडताळणीसाठी उपस्थित राहिल्याने त्यांची निवड यादी दिनांक १५ एप्रिल, २०२० रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पोर्टलवर त्यांच्या गुणवत्तेनुसार प्रसिध्द करण्यात आली असे बृहन्मुंबई महरनगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिकेत अनियमितता व गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) ३२०२ (२९-०५-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेचा सन २०१७-२०१८, २०१८-२०१९ व २०१९-२०२० मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या लेखा परिक्षण व कॅगच्या अहवालानुसार सदर महापालिकेत अनियमितता तसेच गैरकारभार झाल्याचे आढळून आले आहे तसेच माजी आयुक्त व अधिकाऱ्यांवर अनियमितात केल्याबाबतचे आरोप करण्यात आले असून महानगरपालिकेच्या जवळपास २५० विभागाकडून स्पष्टीकरण मागविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अकोला महानगरपालिकेने कोणतेही स्पष्टीकरण दिले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०९-२०२०) :** (१), (२), (३) व (४) शासकीय/ निमशासकीय संस्थांचे महालेखापाल कार्यालयाकडून होणारे लेखापरिक्षण ही नियमित बाब आहे.

या अंतर्गत, महालेखापाल कार्यालयाने अकोला महानगरपालिकेच्या सन २०१७-२०१८ च्या लेखापरिक्षणात महापालिकेच्या विविध विभागाशी संबंधित एकूण २७ लेखा आक्षेप काढले असून, या सर्व लेखा आक्षेपांचा अनुपालन अहवाल महापालिकेकडून महालेखापाल कार्यालयास सादर केला आहे.

या २७ लेखा आक्षेपांपैकी ०५ लेखा आक्षेप महालेखापाल कार्यालयाने वगळलेले आहेत. इतर लेखा आक्षेपाबाबत कार्यवाही सुरु आहे.

सन २०१८-२०१९ च्या लेखापरिक्षणात एकूण १८ लेखा आक्षेप काढण्यात आले असून, या आक्षेपांचा अनुपालन अहवाल सादर करण्याची कार्यवाही महापालिकेकडून करण्यात येत आहे.

या लेखा आक्षेपांमध्ये, महापालिकेच्या माजी आयुक्त व अधिकाऱ्यांनी अनियमितता केल्याचे कोणतेही आरोप नमूद नाहीत.

सन २०१९-२०२० चे लेखापरिक्षण महालेखापाल कार्यालयाकडून अद्याप झालेले नाही असे आयुक्त, अकोला महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

---

## राजगुरुनगर (ता.खेड, जि.पुणे) नगरपरिषदेत अपहार झाल्याबाबत

**(२४) ३२०४ (२९-०५-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर (ता.खेड, जि.पुणे) नगरपरिषदेचे आर्थिक वर्ष २०१८-२०१९ चे लेखापरीक्षण नुकतेच पूर्ण करण्यात आले असून सदर लेखापरीक्षण अहवालामध्ये अपहार झाल्याची माहिती समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नगरपरिषदेने नागरिकांकडून वसूल केलेल्या रकमेपैकी एकूण ७१ लाख ६९ हजार ५५७ रुपये इतकी रक्कम नगरपरिषदेच्या बँक खात्यामध्ये जमा केली नसल्याची बाब दिनांक ४ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त नगरपरिषदेतील अपहारास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) व (२) राजगुरुनगर नगरपरिषदेच्या सन २०१८-२०१९ च्या वार्षिक लेखा परिक्षणामध्ये रुपये ७१ लाख ६९ हजार ५५७ इतकी विविध कराव्दारे जमा झालेली रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांनी नगरपरिषदेच्या बँक खात्यात जमा केली नसल्याचे फेब्रुवारी, २०२० मध्ये दिसून आले आहे.

श्री.नरेंद्र कणसे, नगरपरिषदेचे अंतर्गत लेखा परिक्षक यांनी याप्रकरणी तपशिलवार चौकशी करुन संबंधितांची जबाबदारी निश्चित केली आहे.

(३) सन २०१८-२०१९ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालामध्ये आक्षेप / त्रुटी आढळून आल्यानंतर नगरपरिषदेने अंतर्गत लेखा परिक्षकामार्फत करण्यात आलेल्या तपशिलवार चौकशीमध्ये एकूण १२ कर्मचाऱ्यांवर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

चौकशी करताना सन २०१८-२०१९ मधील रुपये ७१,६९,५५७/- तसेच दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक १०/०५/२०१९ या कालावधीतील रुपये ५,६०,४१९/- इतकी रक्कम देखील संबंधित कर्मचाऱ्यांनी बँक खात्यात जमा केली नसल्याचे दिसून आले आहे.

नगरपरिषदेच्या एकूण १२ कर्मचाऱ्यांपैकी ६ कर्मचाऱ्यांना नगरपरिषदेने निलंबित केले आहे. तसेच त्यांच्याविरुध्द दिनांक ३१/०५/२०२० रोजी खेड पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

उर्वरित ६ कर्मचाऱ्यांच्या निश्चित झालेल्या रक्कमा रुपये २० हजाराच्या आतील असल्याने त्यांचेविरुध्द नगरपरिषदेने विभागीय चौकशी सुरु केली असून त्यांना दिनांक ०२/०६/२०२० रोजी नोटीस देण्यात आल्या आहेत.

नगरपरिषदेने सदर कर्मचाऱ्यांना रक्कम वसुली संदर्भात देखील नोटीस दिल्या होत्या. त्यानुसार एकूण रक्कमेपैकी रुपये ३७,९२,७१२/- इतकी रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांनी नगरपरिषदेकडे भरणा केली आहे.

त्यानंतर संबंधित कर्मचारी श्री.अमर मारणे यांनी नगरपरिषदेची पूर्व परवानगी न घेता नगरपरिषदेच्या खात्यात दिनांक १५/०६/२०२० रोजी

रुपये ३४,३२,६४५/- इतकी रक्कम जमा केली आहे. या जमा रक्कमेबाबत व इतर शिल्लक रक्कमेबाबत पोलीस पुढील तपास करीत असल्याचे नगरपरिषदेने कळिवले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई कोळीवाडा येथील नुरी मैदानाजवळ सुरु झालेल्या शुध्द पाण्याच्या प्रकल्पाची चौकशी करण्याबाबत

**(२५) ३२२८ (०३-०६-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई कोळीवाडा येथील नुरी मैदानाजवळ शुध्द पाण्याचा प्रकल्प सुरु करण्यात आला असून त्यास सक्षम प्राधिकरणाने परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी अनेक शुध्द पाणी पुरविणाऱ्या कंपन्या कार्यरत असून ह्या कंपन्या पाण्याचे शुध्दीकरण योग्य प्रकारे करतात काय व त्यांच्याकडे परवाने आहेत काय, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) तसेच सदर प्रकल्पाबाबत तेथील नागरिकांनी तक्रारी केल्या असता वसई विरार महापालिकेने परवानगीचे कागदपत्र सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१०-२०२०) :** (१) व (२) वसई कोळीवाडा येथील नुरी मैदानाजवळ असलेल्या शुध्द पाणी प्रकल्पास, प्रकल्प सुरु करणेकरिता सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेण्यात आली नसल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर प्रकल्पास व्यवसाय ना-हरकत दाखला असा कोणताही परवाना देण्यात आलेला नाही.

तथापि, शुध्दीकरण प्रकल्प योग्य प्रकारे करतात किंवा कसे याबाबत कार्यवाही अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत केली जाते.

(३) व (४) सदर प्रकल्पाबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत शासकिय परवानग्याचे कागदपत्र सादर करण्याबाबतची नोटीस बजाविण्यात आली होती.

तथापि, सदर प्रकल्पाकडून कागदपत्रे सादर न केल्यामुळे दिनांक २७/०४/२०२० रोजी नोटीस देऊन महानगरपालिकेमार्फत सदर प्रकल्प बंद करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई-विरार शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पेल्हार धरणातील जलशुध्दीकरण केंद्रामधील यंत्रे बंद असल्याबाबत

**(२६) ३२३५ (२९-०५-२०२०). श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक २०३९ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पेल्हार धरणाच्या जलशुध्दीकरण केंद्रातील आठपैकी पाच यंत्रे देखभाल-दुरुस्ती अभावी गत दोन वर्षांपासून बंद असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील पेल्हार योजनेच्या केंद्रातील जुने जलशुध्दीकरण केंद्र तोडून रॅपीड सँड फिल्टर पध्दतीने ७.५ एम.एल.डी. क्षमतेचे, अंदाजपत्रकीय किंमत रुपये २.८१ कोटीचे नवीन जलशुध्दीकरण केंद्र उभारण्यास सर्वसाधारण सभेने मंजूरी प्रदान केलेल्या निविदा प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे काय,

(३) तसेच वसई-विरार शहरातील सातिवली भागातील वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण करुन तेथे नळजोडण्या देण्याबाबतची कार्यवाही अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

पेल्हार येथील जलशुध्दीकरण प्रकल्प कार्यान्वित असून त्याव्दारे प्रक्रिया केलेला पाणीपुरवठा शहरास करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. तथापि, या केंद्रातील ६ प्रेशर फिल्टर व एक ५० एच.पी. क्षमतेचा पंप कार्यान्वित असून २ प्रेशर फिल्टर व २ पंप स्टँड बाय स्थितीत ठेवण्यात येतात.

(२) वसई-विरार शहर महानगरपालिकेने पेल्हार योजनेच्या केंद्रातील जुने जलशुध्दीकरण केंद्र तोडून रॅपीड सँड फिल्टर पध्दतीने नविन जलशुध्दीकरण केंद्र उभारण्याबाबतच्या निविदा प्रक्रियेची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

वसई विरार शहर महानगरपालिकेने दिनांक १३/०२/२०१९ अन्वये नविन ७.५ द.ल.लि. क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र उभारण्याकामी रुपये २.८१२ कोटीच्या अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामी ५ वेळा जाहिर निविदा सूचना प्रसिध्दी करुन निविदा मागविली असता विहित मुदतीत दोन निविदा प्राप्त झाल्या असून पुढील निविदा मंजुरीची कार्यवाही सुरू आहे.

(३) व (४) वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सातिवली भागातील वितरण व्यवस्थेचे काम तसेच नळजोडणीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्राकरीता पाण्याची गुणवत्ता व शुध्दता वेळोवेळी तपासण्याबाबत व सदर परिसरात स्वच्छतेबाबत विशेष दक्षता घेण्याबाबत वसई विरार शहर महानगरपालिका यांना दिनांक १७/०२/२०२० च्या शासन पत्रान्वये सूचना देण्यात आल्या होत्या.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेंतर्गत सातिवली भागासाठी १३७५४ मी. जलवाहिन्या अंथरणे प्रस्तावित आहे.

सद्य:स्थितीत ८३२७ मी. जलवाहिन्या अंथरुन १५०० मी. जलवाहिन्यांची जलदाब चाचणी पुर्ण होऊन पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

उर्वरित ६८२७ मी. अंथरलेल्या जलवाहिन्यांची जलदाब चाचणी बाकी असल्याचे तसेच सातिवली भागात जलवाहिन्यांची जलदाब चाचणी झाली असून ३२ नळ जोडण्या मंजुरीची कार्यवाही करण्यात आली असल्याची बाब वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे दिनांक २३/०३/२०२० पासून ठेकेदाराने मनुष्यबळाअभावी काम बंद ठेवले आहे.

तसेच अमृत योजनेंतर्गत पाणीपुरवठा वितरण व्यवस्था ६८२७ मी.जलवाहिन्यांची जलदाब चाचणी करण्याबाबत व उर्वरित जलवाहिन्या अंथरण्याचे काम करण्यास सबंधित ठेकेदारास कळविण्यात आले असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) येथील निर्मल आणि भलई ह्या दोन तलावांच्या काठावरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(२७) ३२३८ (२९-०५-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथे पर्यटन स्थळ असलेल्या निर्मळ येथील तलावांना अतिक्रमणाचा विळखा बसल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी निर्मल आणि भलई असे दोन तलाव असून सदर दोन तलावांच्या काठावर तत्कालीन ग्रामपंचायतीपासून आजतागायत अतिक्रमणे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तलावांच्या काठावरील वाढत्या अतिक्रमणामुळे दोन्ही तलावांचे पौराणिक महत्व तसेच नैसर्गिक सौंदर्याला बाधा येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त तलावांच्या काठावरील अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१०-२०२०) :** (१) व (२) वसई (पालघर) येथील निर्मळ येथील तलावाच्या काही किनारी भागात कच्च्या-पक्क्या स्वरुपातील झोपड्या/ घरे आहेत.

निर्मळ व मालई या दोन तलावांच्या किनारी भागात सदरची घरे तत्कालिन ग्रामपंचायत काळापासून अस्तित्वात असल्याची बाब वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) सदर तलावांचे नैसर्गिक सौंदर्य बाधित होत असल्याचे वसई-विरार महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर तलावाच्या काठावर बेकायदेशीर अतिक्रमणे झाली असल्यास सदर अतिक्रमणे निष्कासित करून तलावांचे पौराणिक महत्व व नैसर्गिक सौंदर्य जतन करण्याच्यादृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात पिण्यास अयोग्य आणि आरोग्यास अपायकारक पाण्याची विक्री होत असल्याबाबत

**(२८) ३२८२ (२९-०५-२०२०). श्री.रविंद्र फाटक, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात पिण्यास अयोग्य आणि आरोग्यास अपायकारक अशा पिण्याच्या पाण्याची सर्वत्र राजरोसपणे विक्री होत असल्याची बाब वसई तालुक्यातील श्री.अशोक गजानन शेळके या एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने एका सविस्तर लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-ब मधील ५१ व्यावसायिकांवर वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने नालासोपारा येथील तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिका प्रशासनाने स्थानिक पोलीस प्रशासनाचे सहकार्य घेऊन आपल्या सर्व ९ प्रभाग समित्यांमध्ये अशुध्द पाणी विक्री करणाऱ्या व्यावसायिकांचा शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन हे बेकायदा व्यवसाय कायमस्वरुपी बंद करण्याची मागणी वसई तालुक्यातील अशोक गजानन शेळके यांनी दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास एका सविस्तर लेखी निवेदनाव्दारे आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१०-२०२०)** : (१) व (२) होय, अशा प्रकारचे निवदेन शासनास प्राप्त झाले होते.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्राकरीता पाण्याची गुणवत्ता व शुध्दता वेळोवेळी तपासण्याबाबत व सदर परिसरात स्वच्छतेबाबत विशेष दक्षता घेण्याबाबत वसई-विरार शहर महानगरपालिका यांना दिनांक १७/०२/२०२० च्या शासन पत्रान्वये सूचना देण्यात आल्या होत्या.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने विनापरवाना ८१ बाटली बंद पाणी तयार करुन विकणाऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. यापैकी प्रभाग समिती "ब" मधील ५१ जणांवर गुन्हे दाखल केले असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) वसई-विरार शहर महानगरपालिकेस अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) वसई-विरार शहर महानगरपालिका व शासनाने अशुध्द पाणी विक्री करणाऱ्यांविरुध्द खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे :-

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्राकरीता पाण्याची गुणवत्ता व शुध्दता वेळोवेळी तपासण्याबाबत व सदर परिसरात स्वच्छतेबाबत विशेष दक्षता घेण्याबाबत वसई विरार शहर महानगरपालिका यांना दिनांक १७/०२/२०२० च्या शासन पत्रान्वये सूचना देण्यात आल्या होत्या.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने विनापरवाना बाटलीबंद पाणी तयार करुन विकणाऱ्या विक्रेत्यांवर कार्यवाही करण्याकरीता अणुजीवशास्त्रज्ञ, ठाणे यांच्याकडे सदर पाणी विक्रेते यांच्याकडील पाण्याचे नमुने घेवून तपासणीसाठी पाठविण्यात आले होते.

मुख्य अणुजीवशास्त्रज्ञ यांच्या अहवालानुसार एकूण ८१ अशुध्द पाणी विक्री व्यावसायिकांविरुध्द महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील विविध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील कायदेशीर कार्यवाही पोलीस विभागामामार्फत करण्यात येत आहे.

तसेच ९३ पाणी विक्री व्यावसायिकांना नोटीसा बजावून अशुध्द पाणी विक्रीचा व्यवसाय बंद करण्याबाबत नोटीसा बजावण्यात येऊन पुढील कार्यवाही सुरू असल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील पाच अग्निशमन उपकेंद्रे प्रलंबित असल्याबाबत

**(२९) ३२८८ (०३-०६-२०२०). श्री.रविंद्र फाटक, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकाक्षेत्रातील पेल्हार, वालीव, नवघर (पूर्व), वसई गाव आणि उमेळा या ५ ठिकाणी महानगरपालिका प्रशासनाकडून सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अग्निशमन उपकेंद्र प्रस्तावित केली असून सदर अग्निशमन उपकेंद्रांच्या निर्मितीसाठी शासनाने सन २०१८-२०१९ मध्ये रुपये ५० कोटी २४ लक्ष तसेच सन २०१९-२०२० मध्ये रुपये ४८ कोटी २४ लक्ष इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित अग्निशमन केंद्रासाठी निधीची तरतूद असताना देखील गत अडीच वर्षांपासून उक्त उपकेंद्रांच्या उभारणीला सुरुवात झाली नसल्यामुळे दिरंगाईस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी वसई तालुक्यातील श्री.अशोक गजानन शेळके या एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकारी यांनी दिनांक ०५ एप्रिल, २०१९ रोजी एका सविस्तर लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री व मा.नगर विकास राज्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१०-२०२०) :** (१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील पेल्हार, वालीव, नवघर (पूर्व), वसई गाव आणि उमेळा या ५ अग्निशमन उपकेंद्राच्या कामांसाठी महानगरपालिकेने सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० मध्ये रुपये ६ कोटी इतकी तसेच सन २०२०-२०२१ साठी रुपये १६ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतुद केली आहे.

(२) व (३) अशा प्रकारचे लेखी निवदेन प्राप्त झाले असून आवश्यकती नियमोचित कार्यवाही करण्यासाठी वसई-विरार शहर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी कळविल्यानुसार अग्निशमन उपकेंद्रासाठी जागा उपलब्धतेनुसार अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची प्रशासकीय मान्यता घेऊन पुढील कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

तसेच नवघर (पु.) येथील अग्निशमन उपक्रेंद्राचे बांधकाम पुर्ण झाले असून वसई गाव येथील अग्निशमन उपकेंद्र बांधकामासाठी कार्यादेश देण्यात आला आहे. परंतु उपक्रेंद्राच्या लगतची अतिरिक्त जागा उपलब्ध होत

असल्याने केंद्र विस्तारीत करण्याच्यादृष्टीने सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. पेल्हार व वालीव येथील कामांसाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे. तसेच उमेळा येथे जागेसंदर्भात वाद असल्याने कार्यवाही प्रलंबित आहे.

उमेळा येथील अग्निशमन उपकेंद्रासाठी पर्यायी जागा शोधून तेथे उपकेंद्र उभारणे प्रस्तावित वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनामार्फत युट्यूब व न्युज पोर्टल चॅनेल यांच्या नोंदणीसाठी नियमावली तयार करण्याबाबत

**(३०) ३३१२ (२९-०५-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने युट्यूब चॅनेल व न्युज पोर्टल चॅनेलचे पत्रकार अधिकृत नसल्याबाबतचा निर्णय दिनांक १ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत युट्यूब चॅनेल व न्यूज पोर्टल चॅनेल यांच्या नोंदणीसाठी नियमावली तयार करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, शासनाने न्युज पोर्टलची नोंदणी, निकष व त्यांना अधिस्वीकृती पत्रिका प्रदान करण्यासाठी नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनास अद्याप सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर अहवाल प्राप्त होण्याचा कालखंड काय असून युट्यूब चॅनेल व न्युज पोर्टलमध्ये जाहिराती देण्याबाबत कोणते धोरण अथवा नियमावली तयार केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१२-१०-२०२०) :** (१) युट्यूब पोर्टवर अनेक व्यक्तींनी/संस्थांनी न्युज चॅनेल सुरु केले आहेत. सदर चॅनेलच्या प्रतिनिधींला पत्रकार सुविधा देण्याबाबत स्थानिक पातळीवर मागणी होत असल्याने, त्याबाबत महासंचालनालयांच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. सदर बैठकीत वृत्तपत्रे आणि दूरचित्रवाणी/वृत्तवाहिन्या यांची केंद्र शासनाकडे रितसर नोंदणी होत असते, तशी कोणत्याही प्रकारची व्यवस्था यूट्युबरील न्युज चॅनेल आणि न्युज पोर्टल यांच्याबाबतीत होत नसल्याने, अशा चॅनेलच्या प्रतिनिधींना पत्रकारांसाठी असलेल्या सोयी सुविधा देता येत नसल्याचे स्पष्ट केले आहे.

(२) Youtube व न्युज पोर्टल चॅनेल यांच्याबाबत नियमावली केंद्र शासनामार्फत हाताळले जाते.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला शहरामध्ये रिलायन्स जियो, स्टरलाईट टेक व इतर खाजगी दूरसंचार कंपन्यांनी अनधिकृतरित्या रस्त्यांचे खोदकाम केल्याबाबत

**(३१) ३५३३ (२९-०५-२०२०). डॉ.रणजित पाटील, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ९६० ला दिनांक ११ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेच्या हद्दीतील रिलायन्स जिओ प्रायव्हेट लिमिटेड व स्टारलाईट टेक या खाजगी दूरसंचार कंपनीने महापालिकेची पूर्व परवानगी न घेता एकूण ७९ रस्त्यावर ६६.५५ कि.मी. लांबीची ओएफसी केबल अनधिकृतरित्या टाकून महत्वाच्या रस्त्यांचे खोदकाम केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहिन्या टाकण्याचे काम सन २००८ पासून सुरु असल्याची बाबही निदर्शनास आली असून सद्य:स्थितीत महानगरपालिकेमार्फत रिलायन्स जिओ इन्फोकॉम कंपनीच्या अधिकाऱ्यांविरुध्द पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शहरात टाकण्यात आलेल्या दूरसंचार वाहिन्यांमध्ये अनेक कंपन्यांचा समावेश असून, नेमकी कोणती वाहिनी, कोणत्या कंपनीची आहे याबाबत स्पष्टता होत नसल्याने या संपूर्ण प्रकरणात सर्व कंपन्यांच्या प्रतिनिधीसमवेत बैठका घेऊन वाहिन्यांची केलेल्या पडताळणीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच उक्त प्रकरणी महानगरपालिकेचा सुमारे ३० कोटी रुपयांचा महसूल बुडाला असल्यामुळे दोषी कंपन्यांवर व अनधिकृतरित्या परवानगी देणाऱ्या बांधकाम विभागाच्या (अकोला मनपा) अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०९-२०२०) :** (१) अकोला शहरात दूरसंचार कंपन्यांनी महानगरपालिकेची परवानगी न घेता, खोदकाम करुन, अनधिकृतरित्या मोठ्या प्रमाणात केबल टाकल्यासंदर्भात जानेवारी, २०२० मध्ये वृत्तपत्रात बातमी आली होती, हे खरे आहे.

(२) महापालिकेची पूर्व परवानगी न घेता, शहरातील ७९ रस्त्यावर एकूण ६६.५५ कि.मी. लाबींची अनधिकृतरित्या ओएफसी केबल टाकल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आल्यानंतर, महापालिकेने रिलायन्स जिओ इन्फोकॉम या कंपनीच्या अधिकाऱ्यांविरुध्द पोलीस तक्रार दाखल केली आहे.

(३), (४) व (५) यासंदर्भात, संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधीसमवेत बैठका घेण्यात आल्या असून, या बैठकीच्यावेळी, त्यांच्याकडील सर्व माहिती कंपन्यांनी स्वत: महापालिकेस सादर करावी व सदरची बाब नियमानुकूल करुन घेण्याबाबत सूचित केले होते.

याशिवाय, सदरचे प्रकरण महानगरपालिकेशी संपर्क करुन, आपापसातील समन्वयाने निकाली काढावे, अशा सूचना केंद्रीय दूरसंचार विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रिलायन्स जिओ कंपनीला दिलेल्या आहेत.

यानुषंगाने, रिलायन्स जिओ इन्फोकॉमचे अधिकारी व महानगरपालिकेचे अभियंते यांच्या संयुक्त सर्वेक्षणानुसार, एकूण ६६.५५ कि.मी. अनधिकृत केबलपैकी २२ कि.मी. अनधिकृत केबल असल्याचे कंपनीने मान्य केले आहे. व उर्वरित लांबीसाठी कंपनीने तत्कालीन ग्रामपंचायत व राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेतलेल्या परवान्याची कागदपत्रे महापालिकेकडे सादर केली असून, त्याची पडताळणी महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

याशिवाय महापालिकेने राज्य शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून या कंपन्यांना दिलेल्या परवानगीबाबतची कागदपत्रे अंशत: प्राप्त झालेली असून, ही कागदपत्रे आणि कंपन्यांकडून सादर केलेली कागदपत्रे या आधारे नक्की किती महसूल बुडाला याचा अंदाज घेण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

---

## ठाणे शहरात जमिनीचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३२) ३५४८ (०३-०६-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील माजिवडे आणि जेऊर परिसरातील पूर्वीच्या ग्वाल्हेर संस्थांच्या ताब्यातील सुमारे ३२७ एकर जमीन विकासक आणि भूखंड माफियांनी महापालिकेच्या संगनमताने बळकावली असून आजच्या बाजारभावाप्रमाणे सदर जमिनीची किंमत सुमारे आठ हजार कोटी रुपये आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्वाल्हेर संस्थान व मध्य प्रदेश शासनाच्या दुर्लक्षामुळे सदर जमिनीचा गैरव्यवहार झाला असल्याचे चौकशी अंती निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१०-२०२०) :** (१), (२) व (३) प्रोव्हीडेन्ट इनव्हेस्टमेंट कंपनी लि., ही मध्य प्रदेश सरकारची अंगीकृत कंपनी असुन मुंबई व ठाणे येथील काही मालमत्तांची उक्त कंपनीमार्फत देखभाल करण्यात येत असल्याचे तसेच केंद्र शासनाने उक्त सर्व मालमत्तांची यादी मध्य प्रदेश सरकारकडे मागितली असुन याप्रकरणी केंद्र शासन स्तरावर प्रकरण सुरु असल्याने या मालमत्तांसंदर्भात हक्क हस्तांतरण, इ. कोणतेही व्यवहार करण्यात येऊ नयेत अशी विनंती सचिव, वित्त विभाग, मध्य प्रदेश शासन यांनी केली व त्यानुषंगाने सचिव, वित्त विभाग, मध्य प्रदेश यांचेकडून प्राप्त यादीतील तसेच प्रोव्हीडेन्ट इनव्हेस्टमेंट कंपनी लि., यांच्या देखभालीतील कोणत्याही मालमत्तेसंदर्भात विकास परवानगी दुरुस्ती, हक्क हस्तांतरण इ. प्रस्तावास मान्यता देऊ नये, अशा सूचना ठाणे महानगरपालिका यांना दिनांक १५/११/२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

तसेच याप्रकरणी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.३६/१९६३ प्रलंबित असल्याचे व केंद्रीय अन्वेषण विभागामार्फत तपास सुरु असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोनपेठ (जि.परभणी) येथील वाण नदीवरील पुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३३) ३५६९ (२९-०५-२०२०). श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनपेठ (जि.परभणी) येथून नाथरा मार्गे अंबेजोगाईला जोडणाऱ्या वाण नदीवरील पुलाचे काम गत ६ वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलासाठी १ कोटी ३९ लाख रुपयांचा निधी मंजूर असूनही सन २०१३ मध्ये सुरु केलेले काम दोन वर्षाची मुदत संपुष्टात येवूनही अपूर्णावस्थेत असल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना शेतात जाणे कठिण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (३०-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन काम ९५ टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम माहे डिसेंबर, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली व परभणी जिल्हयातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३४) ३६०७ (२९-०५-२०२०). श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली व परभणी जिल्हयातील राज्यमार्गाची तसेच छोट्या गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असून जागोजागी खड्डे पडले असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी व हिंगोली जिल्हयातील ग्रामीण रस्त्याकरिता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत तसेच गत दोन वर्षात केंद्र व राज्य शासनाकडून अत्यल्प निधी प्राप्त झाल्यामुळे सद्य:स्थितीत सुरु झालेली कामे निधी अभावी बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (३०-०९-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

कोविड-१९ या साथरोगामुळे मजुर, यंत्रसामुग्री, बांधकाम साहित्य इत्यादीच्या उपलब्धतेवर परिणाम झाल्यामुळे खड्डे भरण्यात अडचण निर्माण झाली आहे.

(२) हिंगोली व परभणी जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत प्राप्त मर्यादित निधीमध्ये कामे सुरू आहेत. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी प्राप्त निधीच्या अधिन राहून कामे हाती घेण्यात आलेली आहेत. तसेच, लॉकडाऊन मधील मर्यादित शिथिलतेनंतर व निधीच्या उपलब्धतेनुसार राज्यमार्गाची कामे कार्यान्वित करून रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिकेमध्ये विविध संवर्गातील पदे रिक्त असल्याबाबत

**(३५) ३६१२ (०३-०६-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेमध्ये बऱ्याच वर्षापासुन गट अ व ब प्रतिनियुक्तीची पदे तसेच गट अ, ब, क व ड संवर्गातील पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असून प्रतिनियुक्ती, सरळ सेवा व पदोन्नती इत्यादी मंजूर १६४९ पदांपैकी ९२४ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे अकोला महानगरपालिकेच्या कामकाजावर प्रचंड मोठा तणाव पडत असून अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे शासनाच्या महत्वकांक्षी भुमीगत गटार योजना, प्रधानमंत्री आवास योजना,

स्वच्छ भारत योजना, शौचालय योजना, एल.ई.डी.लाईट इत्यादी योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अकोला महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असली तरी, उपलब्ध असलेल्या अधिकारी/कर्मचारी तसेच शासकीय धोरणानुसार कंत्राटी पध्दतीवरील उपलब्ध अधिकारी/कर्मचारी यांचेकडून महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजाची तसेच शासनाच्या विविध योजनांची पूर्ण क्षमतेने आणि समन्वयाने अंमलबजावणी केली जात आहे.

सन्माननीय लोकप्रतिनिधींनी विधानमंडळाच्या विनंती अर्ज समितीकडे यासंदर्भात अर्ज सादर केला होता. समितीने या अनियमिततेच्या तक्रारीबाबत चौकशीसाठी सन्माननीय लोकप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नियुक्त केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिडेवाड्याची (जि.पुणे) दुरुस्ती करुन राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याबाबत

**(३६) ३९४५ (१४-०९-२०२०). श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ७३८ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिडेवाडा (जि.पुणे) येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरु केलेली देशातील पहिल्या मुलींच्या शाळेची वास्तू मोडकळीस आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वास्तूस दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी १७२ वर्षे पुर्ण झाली असल्याने उक्त वास्तू ऐतिहासिक वास्तू म्हणून घोषित करून त्याठिकाणी राष्ट्रीय स्मारक उभारण्याची मागणी अनेक सामाजिक संस्थांमार्फत करण्यात आली असूनही भिडेवाडा शाळा ही राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित होण्यापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेने सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात भिडेवाड्याच्या दुरुस्तीसाठी एक कोटी रुपयांची तरतूद करूनही दुरुस्तीचे काम करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ऐतिहासिक वास्तूचे जतन करुन राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-१०-२०२०) :** (१), (२), (३) व (४) भिडेवाडा, बुधवार पेठ, पुणे येथे महात्मा ज्योतिबा फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली होती. सदर वास्तु मोडकळीस आलेली आहे, हे खरे आहे.

या वास्तुच्या दुरूस्ती व राष्ट्रीय स्मारक उभारणे या कामाकरीता सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात रुपये १,४०,००,०००/- एवढी तरतूद करण्यात आलेली आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

मुलींची शाळा असलेला वाडा ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेला पुणे महानगरपालिकेने सुरूवात केलेली होती.

तथापि, भू-संपादनाच्या प्रक्रियेला सदर वाड्यातील भाडेकरूंनी मा.उच्च न्यायालयात आव्हान दिलेले असून, सदर याचिका मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे भू-संपादनाबाबत पुढील कोणतीही कार्यवाही करणे शक्य झालेले नाही. स्थगिती उठवण्यासाठी व याप्रकरणी शासनाची बाजू मांडण्यासाठी मा.महाअधिवक्ता यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या प्रकरणी येणाऱ्या विविध अडचणींबाबत सन्माननीय तोडगा काढण्याच्या दृष्टीकोनातून पुणे महानगरपालिका व शासनस्तरावर प्रयत्न सुरू आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रूग्णालयात प्राणवायू (ऑक्सिजन) पुरवठा यंत्रणेत बिघाड झाल्याबाबत

**(३७) ४०३८ (१७-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रूग्णालयात प्राणवायू (ऑक्सिजन) पुरवठा यंत्रणेत बिघाड झाल्याने १० हून अधिक कोरोना बाधित रूग्णांचा मृत्यू झाल्याप्रकरणी चौकशी करून तत्काळ योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशा आशयांचे मागणी पत्र मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच केईएम रुग्णालयातील कोरोना बाधित I.C.U वॉर्डातील नर्सेस व वॉर्डबॉय तासन-तास जागेवर रहात नसल्यामुळे रुग्णांना पिण्यासाठी पाणीही मिळत नसल्याची बाब माहे जून, २०२० च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कोरोनाचा कहर वाढत असताना ऑक्सिजन अभावी कोरोना बाधित मृतांच्या संख्येत वाढ होणार अशी जागतिक आरोग्य संघटनेने भिती व्यक्त केली असल्यामुळे ऑक्सिजन पुरवठा करणाऱ्या यंत्राची निगा राखणे अत्यावश्यक असूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयात ऑक्सिजन अभावी कोणत्याही रुग्णाचा मृत्यू झाल्याची घटना घडली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, मा.विरोधी पक्षनेता यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना या विषयी निवेदन दिलेले आहे.
(२) कोरोना बाधित आय.सी.यू. कक्षामधील परिचारीका व कक्षपरिचर यांना केवळ तेथेच कर्तव्यार्थ नेमलेले आहे. यास्तव, ते जागेवर राहत नाहीत हे खरे नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच रुग्णांसाठी पाणी व इतर सुविधा आय.सी.यू. कक्षातच पुरविण्यात येतात असेही महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) हे खरे नाही.

ऑक्सिजन पुरवठा करणाऱ्या यंत्राची पुरवठादाराकडून नियमित देखभाल केली जाते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर "पर्जरि" या गुन्हयाबद्दल फौजदारी कारवाई करण्याबाबत

**(३८) ४०५९ (१७-०७-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रधान सचिव, मनोज सैनिक, सचिव, सी.पी. जोशी व सचिव (बांधकामे), अजित अरविंद सगणे या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बनावट न्यायालयीन आदेशाचा प्रतिज्ञापत्रात उल्लेख करून खोटे

रेकॉर्ड तयार करण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यानंतर, मुंबई उच्च न्यायालयाने कडक शब्दात ताशेरे ओढत या तिघांवरही शपथपुर्वक खोटे बोलण्याच्या "पर्जरि" या गुन्हाबद्दल फौजदारी कारवाई करण्याबाबत दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी आदेश दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.न्या.गिरीश कुलकर्णी यांनी या तिन्ही अधिकाऱ्यांना फैलावर घेतले असता त्यावेळी वरिष्ठ वकील उभे करून तिघांनीही गयावया करत प्रतिज्ञा पत्रातील आक्षेपार्ह भाग वगळण्याची व झालेल्या चुकीबद्दल माफी मागण्याची तयारी दर्शविली, न्याय तत्वाला धरुन न्यायालयाने त्यांना सुधारित प्रतिज्ञापत्र व माफीनामा सादर करण्याची परवानगी दिली. मात्र पर्जरिच्या कारवाईचा विचार सोडून देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आपण जे प्रतिज्ञापत्र करत आहोत ते वाचुन त्याच्या सत्यतेविषयी खात्री करून घेण्याची तसदीही ह्या वरिष्ठ अधिकाऱ्यानी घेऊ नये, हे अत्यंत खेदजनक असल्याचेही न्यायमूर्तीनी म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर अद्याप कोणतीही फौजदारी कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१६-१०-२०२०)** : (१) सदरहू प्रश्नामध्ये उपस्थित करण्यात आलेले मुद्दे/उपप्रश्न हे मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल Commercial Contempt Petition No.९/२०२० (मे.मनाज टोलवेज विरुध्द अधीक्षक अभियंता व इतर) मध्ये दिनांक २४/२/२०२० रोजी झालेल्या सुनावणी संदर्भात आहे. सदरहू प्रकरणाची सुनावणी सुरु असून सदरहू प्रकरण सद्या: मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ठ असून अभिनिर्णयाधीन आहे. याबाबतची सद्य:स्थिती मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास वेळोवेळी

आणून देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र विधानसभा नियम पुस्तिका २०१९ मधील पृष्ठ क्र.१८ वरील नियम क्र.३४(२) एक नुसार विषयांकित प्रकरणी वस्तुस्थिती असल्याने उपस्थित मुद्दयांच्याबाबत न्यायालयीन निकालानंतर त्यानुषंगाने सदर प्रश्नाचे उत्तर सादर करण्यात येईल.
(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प बाधित वाघिवली गावातील कोळी बांधवांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३९) ४२७८ (१७-०७-२०२०). श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४४५ ला दिनांक १८ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्याकरिता शासनाने अनेक गावांसह वाघिवली (ता.पनवेल) या गावातील कोळी बांधवांच्या जमिनी संपादित करून त्यांचे पुनर्वसन केले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाचे लक्ष वेधण्याकरिता वाघिवली गावातील मासेमारी बांधवांनी माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान नवी मुंबईतील सिडको भवनासमोर बेमुदत उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाघिवली गावातील प्रकल्पग्रस्त कोळी बांधवांना पुनर्वसन पॅकेज देणेबाबत कोणती उपाययोजना अथवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) अशी बाब नाही.
(२) वाघिवली गावातील मासेमारी बांधवांनी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सिडको भवन समोर दिनांक २३/१२/२०१९ पासून मुक्कामी मोर्चाचे आयोजन केले होते. अंदोलनकर्त्यांशी केलेल्या चर्चेअंती उपोषण/आंदोलन मागे घेण्यात आले.

(३) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सिडकोव्दारे विकसित करण्यात येत आहे. प्रकल्पबाधितांच्या संमतीने पुनर्वसन पॅकेज, संमती निवाड्याव्दारे जाहीर झाले असून शासन निर्णय, दिनांक ०१/०३/२०१४ व दिनांक २८/०५/२०१४ मधील तरतूदीनुसार भूखंड व इतर आर्थिक लाभ देय करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे येथे १००० बेडचे रुग्णालय उभारण्याबाबत

**(४०) ४३३१ (१६-०७-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये कोरोनाशी लढण्याकरीता उभारण्यात येणाऱ्या रुग्णालयाच्या धर्तीवर ठाण्यातही १००० बेडचे रुग्णालय उभारण्याचे आदेश राज्याचे मा.नगर विकास मंत्री व ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी महापालिकेला दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशानुसार ठाण्यात कोणत्या ठिकाणी सदर रुग्णालय उभारण्यात येणार असून त्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर रुग्णालय ठाणे शहरातील मौजे माजिवडे येथे साकेत-बाळकुम रस्त्यावर असणाऱ्या महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीमध्ये उभारण्यात आले असून ते दिनांक १७/०६/२०२० पासून कार्यान्वित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाण्यातील अर्बन रेस्ट रूमची दुरवस्था झाल्याबाबत

**(४१) ४३४० (१४-०९-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिकेने स्मार्ट सिटी अंतर्गत विविध उपक्रम राबविले असून यामधील महत्त्वाकांक्षी अर्बन रेस्ट रूम प्रकल्पातील १२ अर्बन रेस्ट रुमची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाकरीता दोन कोटी रुपये खर्च करण्यात आला असूनही १२ अर्बन रेस्ट रूमची दूरवस्था होवून ते बंद असल्याने संपूर्ण खर्च वाया गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१०-२०२०) :** (१) केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी योजनेंतर्गत निवडण्यात आलेल्या ८ शहरांपैकी ठाणे एक शहर आहे.

सदर योजनेंतर्गत विविध विकास प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

स्मार्ट सिटी संचालक मंडळामार्फत ठाणे महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात कामानिमित्त घराबाहेर फिरण्यास तसेच रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी विविध १२ ठिकाणी अर्बन रेस्ट रूम बांधण्याचा प्रकल्पाची निवड करण्यात आली.

सदर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेअंती लघुत्तम निविदाकारकास कार्यादेश देण्यात आले.

(२), (३) व (४) सदर प्रकल्पातील १२ रेस्ट रूमपैकी ११ रेस्ट रूमचे काम पूर्ण झाले असून ही सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज आहेत. उर्वरित १ रेस्ट रूमचे काम ९५ टक्के पूर्ण झालेले आहे.

सदरील १२ रेस्ट रुमपैकी ५ रेस्ट रूम नागरिकांच्या वापरासाठी खुली करण्यात आलेली असून उर्वरित ७ रेस्ट रूम सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

## ममदापूर संवर्धन राखीव क्षेत्र राजापूर (ता.येवला, जि.नाशिक) वन पर्यटन अंतर्गत मंजुर करण्यात आलेल्या कामाबाबत

**(४२) ४३९९ (१४-०९-२०२०). श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-२०१७ वन पर्यटन/ईको टुरिझम विकास (२४०६-७४२१) अंतर्गत ममदापूर संवर्धन राखीव क्षेत्रात सायकल मार्ग/निसर्ग पायवाट तयार करण्याकरिता अंदाजित रक्कम २२ लक्ष ५० हजार इतका निधी व संरक्षण मनोरे उभारण्याकरिता अंदाजित १८ लक्ष निधी मंजुर झालेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे पूर्ण झाली आहेत काय, कामे अपुर्णावस्थेत असताना संबधित ठेकेदाराला त्याचा मोबदला देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (१९-१०-२०२०) :** (१) होय.

(२) सदर कामे प्रगती पथावर आहेत. तसेच ज्या ठिकाणी कामे पूर्ण झालेली आहेत त्या ठिकाणी ठेकेदाराला कामाचे देयके अदा केलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद महानगरपालिकेंतर्गत कडेगाव येथील कचरा प्रकल्पाबाबत

**(४३) ४४१६ (१७-०७-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने पडेगाव व चिकलठाणा येथे कचरा डेपोच्या जागेवर कचऱ्यावर कोणतीच प्रक्रिया न करता गत दीड वर्षापासून कचरा टाकण्याचे काम सुरू केले असून उक्त ठिकाणी कचरा प्रकल्प सुरू न झाल्याने आजूबाजूच्या दोन किलोमीटर पर्यंतच्या परिसरात कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरुन विषारी लिचेड थेट नाल्यात वाहून जात असल्यामुळे विहिरी व बोरचे पाणी काळे झाले असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांचे आरोग्य कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे धोक्यात आले असून नागरिक स्वतःला घरात कोंडून घेत आहेत तसेच उक्त परिसरातील विहिरीचे पाणी दूषित झाल्याने शेतकरी विहिरीतले पाणी वापरू शकत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२०) :** (१) औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील पडेगाव येथील कचरा डेपोच्या जागेवर ५० लक्ष लिटर क्षमतेचे टँक बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर ठिकाणी असलेले लिचेड व्हॅक्युम मशीन टँकरव्दारे जवळच्या एस.टी.पी.प्लँटमध्ये प्रक्रिया करण्यासाठी दररोज नेण्यात येते, तसेच या लिचड टँकमध्ये दुर्गंधी न येण्याकरीता दररोज सोडियम हायपोक्लोराईडची फवारणी करण्यात येते.

तसेच, महानगरपालिकेमार्फत चिखलठाणा येथील कचरा डेपोच्या जागेवर घनकचरा व्यवस्थापनांतर्गत १५० मे.टन प्रतिदिन याप्रमाणे कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत असून, यामधून निघणारे लिचड साठवणीसाठी

चिखलठाणा येथेच ४४ लक्ष लिटर क्षमतेचे टँक बांधण्यात आले असून या लिचड टँकमध्ये दुर्गंधी न येण्याकरीता दररोज सोडियम हायपोक्लोराईडची फवारणी करण्यात येते.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुर्तिजापूर (जि.अकोला) येथील प्राध्यापकांची मद्यविक्री दुकानाबाहेर गर्दीला नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्ती केल्याबाबत

**(४४) ४४५० (१४-०९-२०२०). श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) येथे संचारबंदीच्या तिसऱ्या टप्प्यात मद्यविक्री दुकानाबाहेर गर्दीला नियंत्रण ठेवण्यासाठी संत गाडगेबाबा महाविद्यालयाच्या नऊ प्राध्यापकांची समन्वयक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राध्यापकांची मद्यविक्री दुकानासमोर गर्दीला शिस्त लावण्यासाठी नियुक्ती करण्यात आल्याने शिक्षक वर्गातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मद्यविक्री दुकानासमोर गर्दीला नियंत्रण ठेवण्यासाठी नऊ प्राध्यापकांना समन्वक अधिकारी म्हणून नियुक्तीचे आदेश देणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत **?**

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२१-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) कोविड-१९ च्या मार्गदर्शक तत्वांची व सोशल डिस्टंसिंगचे पालन करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ पुरविण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी निदेश दिले होते. त्यानुसार तहसिलदार मुर्तिजापूर यांच्याकडून गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नऊ प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात आली होती.

तथापि, सदर बाब उचित नसल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हाधिकारी, अकोला यांचे निर्देशानुसार संबधीत प्राध्यापकांची नियुक्ती रद्द करण्यात आली असून प्राध्यापकांनी नियुक्तीच्या ठिकाणी प्रत्यक्ष काम केलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार शहरात प्रदूषणाची समस्या वाढत असल्याबाबत

**(४५) ४५१४ (१७-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महापालिकेच्या गोखीवरे येथील सर्वे नंबर ३० (हिस्सा क्र. अ ३१, ३२) येथील १९ हेक्टर जागेवर डम्पिंग ग्राऊंड असून जिल्हाधिकारी, ठाणे यांना घनकचरा प्रकल्पासाठी सन २००४ मध्ये ५० एकर जागा नि:शुल्क देण्यात आली होती. सध्या वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात दररोज ८०० मेट्रिकटन कचरा निर्माण होतो. परंतु, घनकचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेने ४१३ कोटीचा प्रकल्प आखलेला असला तरी त्याची आजमितीस अंमलबजावणी झालेली नसून उक्त महापालिकेला १० वर्षे पूर्ण होऊन देखील गोखीवरे येथील घनकचरा प्रकल्पात निरंक (०%) ही प्रक्रिया केली केली जात नसल्यामुळे परिसरातील अनेक भागात कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे साथीचे आजार पसरले असून आरोग्याच्या भीषण समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी कचऱ्याचे वर्गीकरण करुन मिथेन गॅस, जैवइंधन (बायोगॅस) तसेच खत तयार केले जात नसल्यामुळे परिणामतः कचऱ्याचे डोंगरवजा ढीग दिवसेंदिवस वाढत आहेत तसेच वसई-विरार मधील फक्त विरार येथील बोळींज येथे एकमेव महापालिकेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र असून वसई-विरारमध्ये ठिकठिकाणी सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) उभारणे आवश्यक असूनही अद्याप याबाबत उपाययोजना झाली नसल्यामुळे वसई

विरार येथील झोपडपट्टी, चाळींमधील कोट्यवधी लिटर सांडपाणी आणि मलजल दर दिवशी थेट नाल्यांमध्ये व तेथून ते प्रक्रिया न करता समुद्रात सोडले जात असल्यामुळे हरित वसईचे स्वरुप बदलण्याची भिती पर्यावरण कार्यकर्ते श्री.चरण भट यांनी आपल्या अभ्यासाव्दारे व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वसामान्यांशी निगडित असलेला पर्यावरण अहवाल गत ३ वर्षापासून तयार झाला नसून उक्त महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन करण्यात अपयशी ठरल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियामक महामंडळाकडून खोटा अहवाल सादर करून महापालिकेची पाठराखण केली जात असल्याचा आरोपही श्री.चरण भट यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) व (२) अ) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्याबाबत :-

- गोखीवरे येथील सर्वे नं.३०८ (हिस्सा क्र. अ ३१, ३२) येथील १९ हेक्टर जागेवर डम्पिंग ग्राऊंड असून दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा ६२० मे.टन आहे.
- सन २००८ मध्ये घनकचरा प्रक्रियेसाठी हंजर बायोटिक इंजिनियर्स लि. या कंपनीसोबत करार करुन सन २०१० ते २०१३ पर्यंत कचऱ्यावर प्रक्रिया केली जात होती. परंतु सदर कंपनीला आग लागल्यामुळे सदर प्रकल्प बंद आहे व पुढील काम करण्यास कंपनीने नकार दिला.
- सन २०१० साली सायंटीफीक लॅण्डफिल साईट उभारण्यासाठी रुपये ३१.७२ कोटीच्या प्रकल्प प्रस्तावाला केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे सदर योजनेंतर्गत २६००० चौ.मी. चा सायंटीफीक लॅण्डफिल साईट उभारला. तसेच दैनंदिन घनकचरा व्यवस्थापनासाठी २०१४ साली बीएआरसीच्या मार्गदर्शनाखाली प्रायोगिक तत्वावर प्रकल्प उभारण्यात

व चालवण्यात आला. परंतु २०१७ साली प्रतिकुल परिस्थितीमुळे कचऱ्यावरील प्रक्रियेचे काम बंद करण्यात आले.

- सन २०१९ मध्ये घनकचऱ्यावरील प्रक्रियेसाठी घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प प्रस्ताव वसई-विरार शहर महानगरपालिकेने प्रस्तावित केला आहे.
- सद्य:स्थितीत बायोकल्चर फवारणीव्दारे गोखीवरे येथील कचऱ्यावर प्रक्रिया केली जात असून या ठिकाणी पुरेशा यंत्र सामग्रीव्दारे कचरा प्रक्रिया करणे कोविड-१९ पार्श्वभुमीवर शक्य होत नाही.
- घनकचरा प्रक्रियेकरीता बायोमायनिंगची निविदा वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत मार्च, २०२० मध्ये पुनश्च: मागविण्यात आली.
- महानगरपालिकेने घनकचऱ्याचे बिनड्रोज तयार करुन त्यावर फवारणी करुन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम माहे फेब्रुवारी, २०२० पर्यंत सुरु ठेवले होते. तसेच दिनांक २०/०३/२०२० ला महानगरपालिकेने घनकचरा प्रक्रियेसाठी पुनश्च: बायोमायनिंगचे निविदा मागवले आहे.

ब) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सांडपाणी प्रक्रिया केंद्राबाबत :-

- केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सिटी अंतर्गत दैनंदिन १७४ द.ल.लि सांडपाणी निर्माण होत आहे. दैनंदिन निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रियेसाठी पूर्ण कार्यक्षेत्राला २० झोनमध्ये विभागून भुयारी गटार (सिवरेज सिस्टम) चे प्रकल्प प्रस्ताव तयार करण्यात आले आहे. २० झोन पैकी ७ झोनचे एकूण २२८.५० द.ल.लि क्षमतेचे असलेले एसटीपीचे प्रकल्प प्रस्ताव राज्य शासनास पाठविण्यात आले आहे.
- तसेच २२८.५० द.ल.लि. पैकी ३० द.ल.लि. क्षमतेचे एसटीपी उभारण्यात आले. एकूण २० द.ल.लि. सांडपाणी भुयारी गटारामार्फत महानगरपालिकेने बांधलेल्या एसटीपी प्लांट मधील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते.
- महापालिकेने या क्षेत्रासाठी ७ एसटीपी पैकी ६ एसटीपी मलनिःस्सारण केंद्र व भुयारी गटार योजनेचा सुधारीत प्रकल्प अहवाल तयार केलेला असून तो केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला आहे. अमृत कार्यक्रमांतर्गत सन २०१७-२०१८ साठीच्या वार्षिक

कृती आराखडयात वसई-विरार मलनि:स्सारण योजनेकरीता रुपये १७० कोटीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. नालासोपारा येथे मलनि:स्सारण योजनेचे प्रकल्प अहवाल, संकल्पना आराखडे, नकाशे अंदाजपत्रके बनविण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरु होते.

- श्री.चरण भट यांची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) वसई-विरार शहर महानगरपालिकेने सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वित्तीय वर्षाकरीता पर्यावरण अहवाल तयार करण्याकरीता दोन वेळा निविदा मागविण्यात आले असुन सदर निविदेस मुदतवाढ देऊन देखील एकही ठेकेदार प्राप्त न झाल्याने सदर वर्षाचा पर्यावरणाचा सद्य:स्थिती अहवाल तयार करणे शक्य झाले नाही अशी वस्तुस्थिती वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरातील रस्त्यांच्या कामांकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४६) ४५१९ (१४-०९-२०२०). श्री.अंबादास दानवे : सन्माननीय नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील रस्त्यांसाठी शासनाने १५२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून सदर रस्त्यांची कामे ही एमआयडीसी, एमएसआरडीसी आणि महापालिका या तीन शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून करण्याचे ठरले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तिन्ही यंत्रणांनी शासनाच्या निर्देशानुसार सदर रस्त्यांच्या कामाची निविदा अंतिम केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०२०) :** (१) दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांसमवेत औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीमध्ये औरंगाबाद महानगरपालिकेच्या रस्ते प्रकल्पास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व औरंगाबाद महानगरपालिका यांच्यामार्फत राबविण्यात येणार आहे.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी निविदा प्रक्रिया राबवुन कामास सुरुवात तर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व औरंगाबाद महानगरपालिका यांनी निविदा प्रक्रिया सुरु केल्याचा अहवाल औरंगाबाद महानगरपालिकेने सादर केला आहे.

(३) व (४) प्रस्तुत प्रकल्पाकरीता निधी उपलब्ध करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## वसई-विरार महानगरपालिकेचे साहित्य भंगारामध्ये पडून असल्याबाबत

**(४७) ४५४२ (१७-०७-२०२०). श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक २१५१ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण आणि विद्युत विभागाचे लाखो रुपयांचे साहित्य पेल्हार येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारात विनावापर भंगारात पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार महानगरपालिका प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे लाखो रुपयांचा आर्थिक फटका बसल्याप्रकरणी निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी वसई तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास सविस्तर लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

पेल्हार येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारात प्रभाग समिती-एफ, पेल्हार विद्युत विभागाचे बंदीस्त वर्कशॉप व गोडाऊन आहे. तसेच त्याच ठिकाणी प्रभाग समितीतील सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेची दैनंदिन दुरुस्ती/ आवश्यक विद्युत साहित्यांचा साठा ठेवण्यात येतो. तसेच सदर आवारात प्रभागातील पुनर्वापर करण्यात येणाऱ्या वृक्ष प्राधिकरणाच्या ट्री-गार्डचा साठा देखील करण्यात येत असल्याची वस्तुस्थिती वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) व (३) अशा प्रकारची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांना दिनांक ०३/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत मांस विक्री सुरु असल्याबाबत

**(४८) ४५४४ (१७-०७-२०२०). श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक २१५२ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार शहर महानगरपालिकाक्षेत्रात हजारो मांस विक्रेते अनधिकृतरित्या (बोकड/कोंबडी यांचे) मांस विक्री करण्याचा व्यवसाय करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मांस विक्रेते शासनाने आखून दिलेल्या गुणवत्तेबाबत, स्वच्छतेबाबतचे शासकीय निकष दुर्लक्षित करुन अटी व शर्तींचे सर्रासपणे उल्लघंन करीत असल्याने उक्त अनधिकृत मांस विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी वसई तालुक्यातील एका राजकीय पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास सविस्तर लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व निवेदनाच्या अनुषंगाने कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-१०-२०२०) :** (१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छता अभियानांतर्गत कचरा विलगीकरणाची प्रक्रिया सुटसूटीत करणे अंतर्गत महानगरपालिकेने शहर क्षेत्रात बोकड/कोंबडी मांस विक्री करणाऱ्या केंद्रांचे सर्वेक्षण माहे डिसेंबर, २०१९ पासून सुरु केले आहे. सदर सर्वेक्षणात अंदाजित ६१५ अनधिकृत विक्रेते निदर्शनास आले आहेत.

सदर अनधिकृत विक्रेत्यांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८२, ३८६ अन्वये कारवाई सुरु केली आहे. सदर अनधिकृत विक्रेत्यांवर महानगरपालिकेने दंड ठोठावणे, उघड्यावरील मांसाची विल्हेवाट लावणे याबाबत नोटीसा दिल्या असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) अनधिकृत मांस विक्रेत्यांवर कारवाई करण्याची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली आहे. महानगरपालिका क्षेत्रात मांस विक्री करताना शासनाने मांस विक्रीच्या अनुषंगाने विहित केलेले गुणवत्तेचे व स्वच्छतेचे सर्व निकष पालन करण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यास महानगरपालिकेस सूचित करण्यात आले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार ४१ मांस विक्रेत्यांवर साफसफाईचे निकष पूर्तता करीत नसल्याने दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला) ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपरिषद/नगरपंचायतीमध्ये करण्याबाबत

**(४९) ४५५६ (१७-०७-२०२०). श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला) ग्रामपंचायतीची लोकसंख्या ४० ते ४५ हजार इतकी असुन अनेक महत्त्वाची कार्यालये व संस्था या ठिकाणी कार्यरत असुन, सदर ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपरिषद/नगरपंचायतीमध्ये करण्याचा प्रस्ताव सन २००० पासुन गत २० वर्षे ग्रामसभांच्या ठरावांसहीत तसेच विविध संघटनांच्या माध्यमातुन शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला व गटविकास अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहाराच्या माध्यमातुन पाठपुरावा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिवरखेड गांव हे “ब” वर्ग नगरपरिषदकरिता असणारे सर्व निकष पुर्ण करीत असल्याने त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१७-०९-२०२०) :** (१) नाही. शासनस्तरावर प्रस्ताव प्रलंबित नाही.

(२) शासनस्तरावर प्रस्ताव प्रलंबित नाही तथापि, हिवरखेड ता.तेल्हारा येथे नगरपंचायत स्थापन करणेबाबत हिवरखेड विकास मंच व लोकजागर मंच, हिवरखेड यांनी दिनांक ०३/०९/२०१९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना विनंती अर्ज सादर केला आहे.

(३) शासनास प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महानगरपालिका कर्मचाऱ्यांना नोटीस देण्यात आल्याबाबत

**(५०) ४५६१ (१७-०८-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लॉकडाऊन पासून जे कर्मचारी कामावर रुजू झाले नाही अशा कर्मचाऱ्यांसाठी वारंवार परिपत्रके जारी करून कर्मचाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन केल्यानंतर ७५ टक्के कर्मचारी कामावर रुजू झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेमार्फत कामावर न परतलेल्या कर्मचाऱ्यांना ७२ तासांची नोटीस देवून बडतर्फ करण्याचा इशारा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या घरी असलेली लहान मुले व वयोवृध्द सदस्य यांना कोरोनाची लागण होऊ नये म्हणून कर्मचारी कामावर येण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या सुट्टया गृहीत धरुन वेतन द्यावा किंवा विनावेतन सेवा सुरु ठेवावी, परंतु कामावरून बडतर्फ करू नये अशी मागणी कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कर्मचाऱ्यांबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-१०-२०२०) :** (१) व (२) राज्यातील लॉकडाऊन कालावधीत उपस्थितीबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकातील कर्मचारी कामावर उपस्थित होते. मुंबई महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेतील अनुपस्थित कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीसाठी काही कर्मचाऱ्यांसाठी अशा नोटीस दिलेल्या होत्या.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.